# नवी मुंबई महानगरपालिका

**महानगरपालिका सचिव कार्यालय,नवीन मुख्यालय, ३ रा मजला, बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.**

**-: सर्वसाधारण सभेची नोटीस :-** **दिनांक १२/०६/२०१४.**

नवी मुंबई महानगरपालिकेची जून महिन्याची सर्वसाधारण सभा, शुक्रवार, दिनांक २० जून २०१४ रोजी सकाळी ११.०० वाजता बेलापूर, भुखंड क्रमांक ०१, सेक्टर १५ए, नवी मुंबई महानगरपालिका, नवीन मुख्यालय येथील ५ व्या मजल्यावरील राजमाता जिजाऊ सभागृह येथे खालील विषयांवर विचार करण्यासाठी भरेल :-

१. प्रश्नोत्तरे.

आयुक्तांकडील प्रस्ताव :

२. घणसोली विभागातील प्र.क्र.२६ मधील अंतर्गत रस्त्याची व नमुंमपाच्या विद्युत विभागाने खोदलेल्या पाटीलअळी येथे गणपती मंदीराजवळील पदपथांची सुधारणा करणे.

३. नेरुळ से. २० पुनम टॉवर्स ते सेक्टर-१० गुडवील आर्केड पर्यंत रस्त्याची डांबरीकरणाने सुधारणा करणे.

४. नेरुळ से.११/१५ येथील अक्कलकोट मार्ग व परिसरातील रस्त्याची डांबरीकरणाने सुधारणा करणे.

५. तुर्भे प्र.क्र. ६१ इंदिरानगर येथील वसाहतीलगत भु.क्र. डी-३ ते सी-४१४ पर्यत रस्त्यांची सुधारणा करणे.

६. वाशी सेक्टर ६ येथील उर्वरित रस्त्यांची डांबरीकरणाने सुधारणा करणे.

७. नेरुळ स्मशानभूमी विकसित करणे.

८. सी विभाग वाशी व डी विभाग तुर्भे या कार्यक्षेत्रातील स्मशानभुमीमध्ये (एकुण ०६ स्मशानभुमी) मोफत अंत्यविधी (ऐच्छिक) योजनेची सन २०१४-१५ व २०१५-१६ या दोन वर्षाच्या कालावधी करीता निविदा काढण्यास मंजुरी मिळणेबाबत.

९. मोरबे धरण प्रकल्प येथे धरणाच्या खालील बाजूस संरक्षक भिंत बांधणे.

१०. नवी मुंबई महानगरपालिका मासळी मार्केट इमारतीमधील ओटले/गाळे "परवानगी व अनुज्ञा (Leave and Licence) " तत्वावर देणेबाबत.

११. नमुंमपा शाळा क्र. ६ व ७ करावे येथील ज्ञानदीप शाळेजवळील इमारतीचे पहिल्या व दुस-या मजल्याचे वाढीव बांधकाम करणे.

१२. नमुंमपा शाळा क्र. ३८, ऐरोली से.१४ येथील शाळेचे वाढीव बांधकाम करणे.

१३. नेरुळ सेक्टर-५० येथील मलप्रक्रिया केंद्रातील १ एम.एल.डी. प्रक्रियाकृत सांडपाणी नेरुळ सेक्टर-५४, ५६ व ५८ येथील सिवुडस् इस्टेट को.ऑप. हौ.सोसायटी लि., फेज-२ यांना उपलब्ध करुन देणेबाबत.

१४. वाशी विभागातील हनुमानमंदिर ते कोपरी ब्रीज आणि गावठाणातील ठिकठिकाणी पदपथाची व गटारांची सुधारणा करणे.

१५. नमुंमपास सार्वजनिक प्रयोजनासाठी केंद्र शासन, महाराष्ट्र शासन, सिडको व एम.आय.डी.सी., यांचेकडून प्राप्त झालेल्या/मागणी केलेल्या भूखंड/मिळकतीबाबत.

१६. नमुंमपाच्या जुन्या जड नादुरुस्त वाहनांचे निर्लेखन करणेबाबत.

१७. नमुंमपा मुख्यालयात बँकींग सुविधा उपलब्ध होणेकरीता स्टेट बँक ऑफ म्हैसूर शाखा, सी.बी.डी., बेलापूर यांना जागा उपलब्ध करुन देणेबाबत.

१८. संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान महानगरपालिका क्षेत्रामध्ये राबविणेबाबत.

**१९. सौ. सुनंदा शशिकांत राऊत, यांजकडून :-**

**"महिला व बालकल्याण समिती"** हि विशेष समिती स्थापन करणे.

**२०. श्री. अशोक भाऊसो पाटील, यांजकडून :-**

**"आरोग्य परिरक्षण व वैद्यकिय सहाय्य समिती"** हि विशेष समिती स्थापन करणे.

**२१. सौ. नेत्रा आशिष शिर्के, यांजकडून :-**

**"पाणीपुरवठा व मलनि:स्सारण समिती"** हि विशेष समिती स्थापन करणे.

**२२. श्री. सुरज बाळाराम पाटील, यांजकडून :-**

**"क्रिडा व सांस्कृतिक कार्यक्रम समिती"** हि विशेष समिती स्थापन करणे.

**२३. श्री. अर्जुन विठ्ठल आडागळे, यांजकडून :-**

**"समाजकल्याण व झोपडपट्टी सुधार समिती"** हि विशेष समिती स्थापन करणे.

**२४. श्री. सुरेश गोपाळ शेट्टी , यांजकडून :-**

**"विधि समिती"** हि विशेष समिती स्थापन करणे.

**२५. श्री. विनित मोतीराम पालकर, यांजकडून :-**

"महानगरपालिकेच्या शुक्रवार, दिनांक १८/१०/२०१३ रोजी भरलेल्या सभेत नवी मुंबई महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमाच्या वातानुकुलित आणि सर्वसाधारण बससेवेच्या सुधारित तिकीट दराबाबतचा विषय क्र.४, ठराव क्र.३७९ अन्वयें मंजूर झाला असून सदर ठरावात सभागृहाच्या कामकाजविषयक नियमावलीतील नियम १(र) अन्वये, फेरबदल किंवा रद्द करणे.

**२६. श्री. सुरज बाळाराम पाटील, यांजकडून :-**

"नमुंमपाच्या परिसरातील अत्यावश्यक सेवांमध्ये आरोग्य आणि शिक्षण या दोन्ही सेवा तेवढयाच तोलामोलाच्या आणि आवश्यक आहेत. या दोन्ही सेवांमध्ये कर्मचा-यांचा तुटवडा आहे. सदर ठिकाणी नागरिकांची गरज पाहता त्वरीत कायमस्वरुपी अथवा कंत्राटी पध्दतीवर कर्मचारी भरती करणे.

**२७ ते २९. सौ. सुरेखा रविंद्र इथापे, यांजकडून :-**

(२७) प्र. क्र. ८०, सेक्टर १९ अे, नेरुळ येथील नाल्याच्या बाजूला रस्त्यालगत संरक्षक कठडा बांधणे. (२८) प्र. क्र. ८०, सेक्टर १९ अे, नेरुळ येथील रायन इंटरनॅशनल स्कुल समोरील रस्त्याचे व गार्डनचे सुशोभीकरण करणे. (२९) प्र. क्र. ८०, सेक्टर १९ अे, नेरुळ येथील सर्व फुटपाथची दुरुस्ती करुन नुतनीकरण करणे.

**३० ते ३२. सौ. लता पुष्पराज कोटकर, यांजकडून :-**

(३०) प्र. क्र. ९, सेक्टर १९, I.C.C.I. बॅंके पासुन ते नेवा गार्डन सोसायटी से. २०B पर्यंत जॉगींग ट्रॅक बांधणे. (३१) प्र. क्र. ९, सेक्टर १९ येथे वाचनालय बांधणे. (३२) प्र. क्र. ९, शिवकॉलनी व विटभट्टी, साईनाथवाडी मध्ये सिवरेज लाईन टाकणे.

**३३ ते ३५. सौ. सरोज रोहिदास पाटील, यांजकडून :-**

(३३) नमुंमपाच्या शाळेत शिक्षण घेणा-या विद्यार्थांना योग्य वेळेतच शालेय वस्तु वाटप करणे. (३४) योजना विभागामार्फत घोषित योजनांचा नागरिकांना तत्परतेने लाभ मिळण्यासाठी सर्व विभाग कार्यालयात व नवी मुंबई महानगरपालिका नवीन मुख्यालयात एक खिडकी योजना कार्यान्वित करावी. त्यामुळे इच्छुक लाभार्थ्यांना मार्गदर्शन तथा योजनाचा त्वरीत लाभ घेता यावा. (३५) प्र. क्र. ८१, तलाव व्हिजन अंतर्गत आग्रोळी गाव येथील तलावाचे सुशोभिकरण केले असुन, सदर तलावाभोवती डेकोरेटिव्ह स्ट्रिट लाईट नसल्याने, सकाळी पहाटे जॉगींगसाठी किंवा संध्याकाळी वॉकिंगसाठी जाणा-या नागरीकांची अंधारामुळे गैरसोय होत आहे. तरी आग्रोळी येथील तलावाभोवती डेकोरेटिव्ह स्ट्रिट लाईट लावणे.

**३६ व ३७. सौ. सिंधुताई अरविंद नाईक, यांजकडून :-**

(३६) प्र. क्र. ५०, वाशी मधील सिडको कालीन दगडबांधकाम असलेली दत्तगुरुनगर वसाहती सभोवतालची चारी बाजूची गटारे, मराठा भवन ते सिध्दीविनायक, सिध्दीविनायक ते ओमकार पर्यंत गटाराची पुर्नबांधणी करणे, मराठा भवन तुळजा भवानी मार्गावरील मराठा भवन ते त्रीवेणी सोसायटी पर्यंत गटार बांधणे, नवप्रेरणा असोसिएशनच्या समोरील एम.एस.इ.बी. ते साईबाबा असोसिएशन पर्यंतचे गटार बांधणे, ए टाईप असोसिएशन ते अष्टभुजा असोसिएशन समोरील गटार बांधणे, दत्तगुरु, वारणा दूध केंद्र ते सिध्दीविनायक पर्यंतच्या गटाराची नव्याने बांधणी करणे, वाशी - कोपरखैरणे मुख्य रस्त्यावरील बी ३/१ पासून वॉर्ड ऑफीस पर्यंतचे गटार बांधणे तसेच सर्व गटारे तोडून आर.सी.सी. करणे. (३७) प्र. क्र. ५०, वाशी, सेक्टर १५ मधील बांधलेल्या बहुउद्‌देशीय इमारतीचे बांधकाम पुर्ण होऊन सुमारे दोन वर्षे पुर्ण झाली आहेत. सदर इमारतीचे अधिकृत उद्‌घाटन करणे.

**३८ व ३९. सौ. रेखा विनोद म्हात्रे , यांजकडून :-**

(३८) प्र. क्र. ८९, करावे गावाच्या पश्चिमेला पुर्वीपासून स्वयंभु जागृत देवस्थान ब्राम्हण देवाचे मंदिर आहे त्या ठिकाणी जाण्यासाठी सध्या कच्चा रस्ता असून त्या ठिकाणी पक्का रस्ता करणे. (३९) प्र. क्र. ८९, करावे गावाच्या पश्चिमेला पुर्वीपासुन स्वयंभु जागृत देवस्थान तलनदेवाचे मंदिर आहे त्या ठिकाणी दिवाबत्तीची (स्ट्रीट लाईट) व्यवस्था करणे.

**४० ते ४२. श्रीमती रोहिणी रमेश शिंदे, यांजकडून :-**

(४०) प्र. क्र. ४८, वाशी मधील महालक्ष्मी अपार्टमेंट (जे एन २ - १ ते २१) इमारतीच्या आतील भागातील उर्वरीत राहीलेल्या भागात पेव्हर ब्लॉक बसविणे. (४१) प्र. क्र. ४८, वाशी श्रध्दा अपार्टमेंट A आणी B मधील (जे एन २ - २२ ते ४२) इमारती मधील आतील भागात पेव्हर ब्लॉक बसविणे. (४२) प्र. क्र. ४८, वाशी शांती सागर व ब्दुहेबन मधील (जे एन ४ - १ ते १६) व भारत अपार्टमेंट (जे एन ३ - १ ते १२) इमारतीच्या आतील उर्वरीत भागात पेव्हर ब्लॉक बसविणे.

**४३ ते ४५. सौ. माधुरी ज. सुतार (पाटील), यांजकडून :-**

(४३)प्र. क्र. ६७, शिरवणे येथे मोठया प्रमाणात वारकरी सांप्रदाय आहे. शिरवणे ग्रामस्थांच्या वतीने दरवर्षी अखंड हरिनाम सप्ताह होत असतो. ती जागा अत्यंत अपुरी आहे. शिरवणे येथील गावदेवी मैदानाच्या एका कोप-यामध्ये विठ्ठल रुखमिणी मंदिरासाठी जागा उपलब्ध करुन दिल्यास ग्रामस्त सदर जागेमध्ये मंदिर निर्माण झाल्यास भाविकांची ये - जा सुरु राहील त्यामुळे गावदेवी मैदान व सदर ठिकाणी असलेली पद्मभुषन नानासाहेब धर्माधिकारी या कला संकूल यांची देखभाल व निगा राहिल तरी ग्रामस्थांनी केलेल्या विनंती नुसार गावदेवी मैदान शिरवणे मध्ये मंदिर उभारणी करिता मिळावे. (४४) ठाणे-बेलापुर रोड व राजीव गांधी उड्डाण पुल लागून आशिर्वाद हॉस्पिटल कडून येणारा रस्ता ज्या ठिकाणी जोडत आहे. पिंपळेश्वर शिव मंदिर या ठिकाणी रहिवाशांसाठी रात्री उपयोग होणेसाठी हाय मास्क बसविणे. (४५) प्र. क्र. ६७, शिरवणेच्या पश्चिम दिशेला शिरवणे गाव परिसरातील नागरिकांचे आराध्य दैवत आहे. तसेच शालेय विद्यार्थ्यांची सदर रस्त्यावर वर्दळ जास्त आहे शिरवणे नागरी आरोग्य केंद्र व रेल्वे या मध्ये मोकळी जागा आहे. सदर मोकळ्या जागेवर नागरिक डेब्रिज केरकचरा टाकत आहे. तरी सदर रस्त्याच्या दोन्ही बाजूला संरक्षित भिंत बांधावी.

**४६ ते ४८. श्री. बाळकृष्ण चाहू पाटील, यांजकडून :-**

(४६) प्र.क्र. २०, रबाळे रेल्वे स्टेशन जवळील स्काय वॉक मध्ये स्थानिकांनाच प्राधान्य देण्यात यावे व नवी मुंबई महानगरपालिकेतुनच कागमार भरती करणे. (४७) प्र. क्र. २०, गोठिवली गावच्या पाठीमागील बाजूस सिवरेज लाईनचे पाणी खाडीत जात असल्याकारणामुळे मच्छी बांधवांचे नुकसान होते. त्यामुळे आपण गोठिवली गावात (एस.टी.पी.) करणे. (४८) प्र. क्र. २०, गोठिवली गावातील खदान तलावामध्ये ज्येष्ठांसाठी विरंगुळा केंद्र, लहान मुलांसाठी गार्डन, तरुणांसाठी जॉगींग ट्रॅक, अत्याधुनिक हायमास्ट, नाना-नानी पार्क बांधणे.

**४९ ते ५१. श्री. रंगनाथ कारभारी औटी, यांजकडून :-**

(४९) प्र. क्र. ६६, मधील चिंचोली तलाव से. २४ ते रेल्वे पटरी से. २४ पर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजुने पदपथावरील स्लॅप व नवीन पदपथ तयार करणे. (५०) प्र. क्र. ६६, विणा हॉटेलच्या बाजूला असलेल्या मोकळया भूखंडात व्यायामशाळा, वाचनालय व डाकघर बनविणे. (५१) प्र. क्र. ६६, शिरवणे गावामध्ये अंतर्गत रोड व गटार, फुटपाथ नवीन तयार करणे.

**५२ ते ५४. श्री. राम आशिष राजबली यादव, यांजकडून :-**

(५२) प्र. क्र. ०६, देवीधाम नगर मध्ये गटर फुटपाथ बनविणे. (५३) प्र. क्र. ०६, यादवनगर एम. आय. डी. सी. रोड मोठे नाले ते देवीधाम नगर नाका बांधणे. (५४) प्र. क्र. ०६, यादवनगर, देवीधाम नगर, संत कबीर नगर येथे गटर वर झाकणे व दिवाबत्तीची सोय करणे.

**५५ ते ५७. श्री. वैभव नारायण गायकवाड, यांजकडून :-**

(५५) प्र. क्र. ५३, अंतर्गत परमाणू नगर, ज्युपिटर, नेपच्युन, प्रियदर्शीनी ते जिमी टॉवर येथे गटारावरील फुटपाथवर इंटरलॉकिंग पेव्हर ब्लॉक बसविणे. (५६) प्र. क्र. ५३, अंतर्गत जिमी टॉवर ते एम.जी.एम. हॉस्पीटल पर्यंत गटारावरील फुटपाथवर इंटरलॉकिंग पेव्हर ब्लॉक बसविणे. (५७) प्र. क्र. ५३, अंतर्गत वाशी पोलिस स्टेशन येथे नवी मुंबई जनता तक्रार निवारण्यासाठी येतात. त्याकरीता त्या परिसरात शौचालयाची व्यवस्था नसल्याने त्यांची गैरसोय होत आहे. तरी सदरच्या परिसरात शौचालयाची व्यवस्था करणे.

**५८ ते ६०. श्री. काशिनाथ जर्नादन पाटील, यांजकडून :-**

(५८) प्र. क्र. ६५, जुईनगर मध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र बांधणे. (५९) प्र. क्र. ६५, जुईनगर महानगरपालिका शाळा क्र. १७ मध्ये माध्यमिक वर्ग सुरु करणे. (६०) प्र. क्र. ६५, जुईनगर, सानपाडा सेक्टर-१० मध्ये समाजमंदिर बांधणे.

**६१ व ६२. श्री. विक्रम धनाजी शिंदे, यांजकडून :-**

(६१) नमुंमपा क्षेत्रामध्ये असणा-या शासकिय इमारतीमध्ये अनेक ठिकाणी नागरिकांची शौचालयाची गैरसोय होत असते. नवी मुंबई क्षेत्रातील पोलिस स्टेशन या ठिकाणी नागरिक आपल्या तक्रारी घेऊन येत असतात. त्यांना शौचालयाची व्यवस्था नसते. त्यामुळे नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी संबंधित विभागाचा "ना हरकत दाखला" घेऊन नमुंमपाने शौचालयांची व्यवस्था करावी . (६२) प्र. क्र. ५१, सेक्टर-१५, १६, १६ए मधील उर्वरित भागामध्ये फुटपाथ व गटारे नादुरुस्त झालेली आहेत. ती नव्याने बांधण्यात यावीत. तसेच वाशी परिसरातील पोस्ट ऑफिस, एम.टी.एन.एल. ऑफिस, १० वी बॉर्ड ऑफिस समोर रेलिंगची व्यवस्था करणे.

**६३ ते ६५. श्री. नामदेव रामा भगत, यांजकडून :-**

(६३) नेरुळ वॉटर बॉडी लगत या आधी जॉगींग ट्रक बसविण्यात आला होता परंतु वाहिणेच्या कामामुळे सदरचे जॉगींग ट्रक नाहिसे झाले (खराब झाले) आहे. त्यामुळे परिसरातील नागरीक रस्त्यावर जॉगींग करीत असतात त्यामुळे अपघात होऊन मनुष्य हानी ना करता येत नाही म्हणून तात्काळ त्या ठिकाणी जॉगींग ट्रक बांधणे. (६४) नमुंमपामार्फत होल्डींग पॉन्ड सभोवताली (जॉगींग ट्रक लगत) विद्युत पोल लावण्यात आले होते परंतु फायबरचे विद्युत पोल असल्याने जलवाहिणेचे काम करीत असताना सदरचे पोलची नादुरुस्ती झाली, सदरचे काही पोल चोरीस गेले, तसेच काही पोल निकामी झाले म्हणून सदरचे ठिकाणी विद्युत पोल पुनश्च लावणे. (६५) नवी मुंबई परिसरातील नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत तलाव व्हिजन या नावाखाली तलावाचे सुशोभीकरण करण्यात आले आहे. काही ठिकाणी काम अर्धवट आहे तसेच काही ठिकाणी केलेले काम खराब झाले आहे. म्हणून सदरची काम पूर्ण करावी तसेच खराब झालेली कामे पून्हा करण्यात यावी. त्याचप्रमाणे प्रत्येक ठिकाणी सूरक्षा रक्षकाची नेमणूक करावी व संरक्षण भितीला लोखंडी गेट लावणे.

**६६ ते ६८. श्री. भोलानाथ महादू ठाकूर, यांजकडून :-**
(६६) प्र. क्र. १, ईश्वर नगर विभागातील सर्व दिशा दर्शक फलक लावण्याची तरतूद करणे. (६७) प्र. क्र. १, ईश्वर नगर विभागातील सर्व सिडको क्लस्टर मध्ये मल:निस्सारण लाईन टाकण्याची तरतूद करणे. (६८) प्र. क्र. १, ईश्वर नगर समाज मंदिर बांधण्याची तरतूद करणे.

**६९ ते ७१. श्री. दशरथ सिताराम भगत, यांजकडून :-**
(६९) **'क' प्रभाग समिती मंजूर दिनांक २६ जून २०१३ ठराव क्र.** २ वाशी रेल्वे स्टेशन जवळील सेक्टर-३० येथील महानगरपालिकेच्या ई.टी.सी. अपंग शिक्षण, प्रशिक्षण व सेवा सुविधा केंद्राच्या नुतन इमारतीच्या वास्तूस "जेष्ठ निरुपणकार, महाराष्ट्र भूषण तिर्थरुप डॉ. नारायण उपाख्य नानासाहेब विष्णू धर्माधिकारी" असे नामकरण करण्यात यावे. **'क' प्रभाग समिती मंजूर दिनांक २६ जून २०१३ ठराव क्र. ३** सानपाडा सेक्टर-१३ येथील महानगरपालिकेच्या भुखंड क्र.८ वरील उद्यानास "तिर्थरूप शारदामाई नानासाहेब धर्माधिकारी" असे नामकरण करणे.

(७०) प्र. क्र. ५५, सानपाडा सेक्टर-१४ बुध्देश्वर शिवमंदिर व सेक्टर-१५ आशापुरा सोसायटीच्या मधून जाणा-या रस्त्यावर अनेक अपघात झाले असून, सदर ठिकाणी अपघातांची संख्या हि दिवसेंदिवस वाढत आहे. तरी सदर ठिकाणी Vehicular Under Pass (VUP) ची निर्मिती व्हावी.

(७१) प्र. क्र. ५५, सानपाडा, सेक्टर-१६ ए, मोराज रेसिडेंन्सीकडून सेक्टर-१८ येथील जयपूरीया स्कूलकडे जाणारा रस्ता सिडको नियोजनाच्या अभावाने वाहनांना जाण्यासाठी अपूरा पडत असल्यामुळे या रस्त्यावर दिवसभर वाहनांची कोंडी होत असते. सदर वाहनांची कोंडी कमी करण्यासाठी सानपाडा सेक्टर-१९ व १८ येथून पामबीच मार्गालगत असलेल्या सर्व्हिस रोडची उर्वरित राहिलेल्या सेक्टर-१७ व नाखवा सिताराम भगत चौकापर्यत निर्मिती करण्यात यावी, तसेच सेक्टर-१३ शाह कॉम्प्लेक्स १ ते नाखवा सितारान भगत चौकापर्यंत पामबीच रोडलगत सर्व्हिस रोडची निर्मिती करणे.

**मा. महापौरांच्या आदेशावरुन,**

**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**महानगरपालिका सचिव (प्र.),**
**नवी मुंबई महानगरपालिका.**

**महापालिका सचिव कार्यालय,**
**नवी मुंबई महानगरपालिका,**
**दिनांक १२ जून २०१४.**